# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com

दिनांक : ०५/०४/२०२४

# प्रेसनोट

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सेक्शन ४० जीवनघोट हॉल समोर , उल्हासनगर-५ येथे डॉ. भरतकुमार जैस्वाल हे बोगस वैद्यकीय व्यावसाय करत असल्याची तक्रार वैद्यकीय आरोग्य विभाग येथे प्राप्त झाली होती. सदर प्राप्त तक्रारी च्या अनुषंगाने महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी यांचेकडे सदर डॉक्टरांची नोंदणी तपासणीकरिता लेखी कळविण्यात आले. मा. प्रबंधक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी यांचेकडील प्राप्त अहवालानुसार व मा. प्रशासक तथा आयुक्त साहेब यांचेकडील मार्गदर्शनानुसार डॉ. सुभाष जाधव, उप आयुक्त (वै.आ.वि), डॉ. मोहिनी धर्मा, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. पल्लवी पगारे, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी पोलीस पथकासह दिनांक २६/०३/२०२४ रोजी सायंकाळी ७.३० वा. अकस्मित धडक भेट दिली असता, सदरचे डॉक्टरकडे चौकशीअंती ते BHMS कर्नाटक येथील पदवीधारक असल्याचे निर्देशनास आले व महाराष्ट्र राज्यात वैद्यकीय व्यावसाय करण्यासाठी महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीचे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. परंतु तसे नोंदणी प्रमाणपत्र (रजिस्ट्रेशन) त्यांच्याकडे आढळून आले नाही, तसेच ते बेकायदेशीरपणे ८ खाटांचा अंतर रुग्ण विभाग (IPD) सुरु करुन रुग्णांवर सलाईनद्वारे ॲलोपॅथी उपचार करत असल्याचे आढळुन आले. त्यानुषंगाने सदर डॉक्टर विरुध्द हिललाईन पोलीस स्टेशन, उल्हासनगर-५ येथे दिनांक ०२/०४/२०२४ रोजी भा.दं.स. १९६० कलम ४१९, ४२० व महाराष्ट्र वै.व्या.अ १९६१ मधील कलम ३३, ३६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

५/४/२४

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.